सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २६४ | मंगळवार, दि. १६ जून २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

रवि ज्वेलर्स
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१
सोने-चांदी
आजचे भाव

| | |
|---|---|
| २४ Ct सोने ९९.५०% | ₹ १४९००० |
| २२ Ct सोने ९१.६०% | ₹ १३७८०० |
| १८ Ct सोने ७५.००% | ₹ ११४७०० |
| शुद्ध चांदी ९९९% | ₹ २५३०/- |

भाव प्रती १० ग्राम

आजचे अभीष्टचिंतन





श्री. राजेंद्र चौधरी
शिक्षक



श्री. सुनील महाजन
अमळनेर



श्री. विनायक जाधव
निवृत्त विमा अधिकारी, अमळनेर



श्री. सचिन अहिरे
शिक्षक



श्री.गौतम बिऱ्हाडे
अमळनेर

# प्रांताधिकारी भंगाळेंकडून मध्यरात्री छापे

## वाळूमाफियांवर कारवाई; ४६ लाखांची मालमत्ता जप्त







अमळनेर : चोपडा तालुक्यात यावल रोड व गरताड शिवारात छापे टाकून वाळू आणि डंपर जप्त करण्यात आले. यावेळी प्रांताधिकारी मयूर भंगाळे, गौरव शिरसाठ, जितेंद्र पाटील व अमोल पाटील आदी.

> विनापरवाना , अवैध गौण खनिज वाहतुकीवर कठोर कारवाई करण्यात येईल. महसूल कर्मचाऱ्यांनी आपापल्या क्षेत्रात लक्ष ठेवावे तसेच जप्त केलेल्या वाहनांची तक्रार आर टी ओ विभागाकडे देखील करण्यात येणार आहे.
> – मयूर भंगाळे ,
> उपविभागीय अधिकारी
> अमळनेर.

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : खबरी आणि सहकारी कर्मचार्यांना थांगपत्ता न लागू देता अमळनेर प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांनी १५ रोजी पहाटे दोन वाजता खाजगी वाहनाने चोपडा तालुक्यात यावल रोड व गरताड शिवारात छापे टाकून दोन डंपर, २७.५ ब्रास वाळू असा एकूण ४६ लाख६६ हजार ३२५ रुपयांची मालमत्ता जप्त करून दोघा डंपर चालकांवर चोपडा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वाळूचे ठेके बंद झाल्यानंतर देखील अवैध वाळू वाहतूक सुरू असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी श्री.भंगाळे याना मिळाली होती.

शासकीय वाहनाने आणि कर्मचार्यांना सांगून गेल्यानंतर माहिती लिक होत होती आणि छापे निष्फळ ठरत होते म्हणून अखेरीस श्री. भंगाळे यांनी शासकीय वाहन घरी ठेवून खाजगी वाहन घेऊन मंडळाधिकारी गौरव शिरसाठ,तसेच ग्राम महसूल अधिकारी जितेंद्र पाटील व अमोल पाटील यांना कारवाई बाबत गोपनीयता ठेवत फक्त रात्रीच्या गस्तीला जायचे असे सांगून अचानक चोपडा तालुक्यात धडक मारली. यावल रोडला बडगुजर पेट्रोल पपंजवळ डंपर क्रमांक जी जे ०७ , व्ही डब्ल्यू ७९३५ अडीच ब्रास वाळू वाहतूक करताना आढळून आला. डंपर अडवून श्री. भंगाळे यांनी पोलीस निरीक्षक पवन देसले, तसेच महसुल कर्मचारी संजय सैतवाल, जगदीश कापडे, विनोद भालेराव याना बोलावून घेतले पंचनामा करून वाहन चालक मनोज कैलास कोळी यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), महसूल अधिनियम कलम ४८(७), ४८(८)(१) , ४८(८)(२) , मोटर वाहन कायदा १८४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येऊन २० लाख रुपयांचे डंपर आणि ६० हजार ५७५ रुपयांची वाळू जप्त करण्यात आली असून तपास जगदीश पाटील करीत आहेत.

श्री.भंगाळे व त्यांच्या पथकाने गरताड रस्त्यावर पहाटे अडीच वाजता छापा टाकला असता संजय पाटील व संजय अग्रवाल यांच्या गट नम्बर २२७/२ या मिक्सर प्लॉट वर डंपर क्रमांक एम एच ३२,क्यू २९४ मध्ये थोडी वाळू आणि त्याठिकाणी २५ ब्रास वाळू साठा आढळून आला. पोलिसांना आणि स्थानिक महसूल कर्मचार्यांना बोलावून त्या डंपर चालकांवर चोरीचा गुन्हा दाखल करून २० लाख रुपयांचा डंपर व ६ लाख ५ हजार ७५० रुपयांची वाळू असा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून तपास हेडकॉन्स्टेबल ज्ञानेश्वर जवागे करीत आहेत.

# अमळनेरात १७ जूनला साजरा होणार वीर शिरोमणी महाराणा प्रताप जन्मोत्सव

## विद्यार्थी गुणगौरव सोहळा, व्याख्यानाचेही आयोजन

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



अमळनेर : वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांचा ४८६ वा जन्मोत्सव सालाबादप्रमाणे यावर्षीही १७ जूनला उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. राजपूत एकता मंच अमळनेर शहर व ग्रामीण यांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, दि. १७ जून रोजी ज्येष्ठ शुक्ल पक्ष तृतीया सन १५४० संध्या. ७ वा.छत्रपती शिवाजी महाराज नाट्य सभागृह,अमळनेर येथे व्याख्यान, विद्यार्थी गुणगौरव सोहळा आणि बक्षिस वितरण होणार आहे.व्याख्यानाचा विषय महाराणा प्रताप, हल्दी घाटी युद्धाची साडे चारशे वर्षे व भारत हा असून प्राचार्य डॉ. संजीव गिरासे हे वक्ते असणार आहेत.यावेळी उदघाटक म्हणून माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील तर अध्यक्षस्थानी खासदार स्मितााताई वाघ व प्रमुख पाहुणे म्हणून लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ.परीक्षित बाविस्कर उपस्थित राहणार आहेत.

महाराणा प्रताप यांच्या शौर्य, स्वाभिमान आणि त्यागाचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचावा या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित केला आहे. कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करून त्यांना बक्षिसे देण्यात येणार आहेत. तरी सर्व समाजबांधवांनी व हिंदू बांधवांनी या ४८६ व्या जन्मोत्सवात उपस्थित राहावे, अशी विनंती राजपूत एकता मंच अमळनेर शहर व ग्रामीण यांनी केली आहे

# शेती पंपांसाठी शेतकऱ्यांना अखंड वीज द्या

## 'महावितरण'सोबतच्या बैठकीत आमदार अनिलदादांची सूचना

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



अमळनेर : 'महावितरण'च्या अधिकाऱ्यांसोबत सोमवार, दि.१५ जून रोजी झालेल्या बैठकीत शेतकऱ्यांना अखंड वीज वितरणाबाबत सूचना करताना आमदार अनिलदादा पाटील.

अमळनेरः- शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन अमळनेरचे आमदार अनिलदादा पाटील यांनी महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत विशेष बैठक घेतली. या बैठकीत शेती पंप वीजपुरवठ्याच्या संदर्भात सविस्तर चर्चा करून महत्त्वाच्या सूचना केल्या.

बैठकीतील प्रमुख मुद्देः

शेतकऱ्यांना पेरणी, रोप लावणी व पिकांच्या पाण्यासाठी नियमित व खंडमुक्त वीज मिळावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून वारंवार होत आहे. ही बाब लक्षात घेऊन आ. पाटील यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना सांगितले की,

शेती पंपांना प्राधान्य द्याः, रोस्टिंग/लोडशेडिंगचा फटका शेती पंपांना बसू नये यासाठी स्वतंत्र फीडरद्वारे किंवा ठराविक वेळेत किमान ८ तास दर्जेदार वीजपुरवठा देण्यात यावा.वीज खंड टाळा- २२० केव्ही व ३३ केव्ही उपकेंद्रांवरील तांत्रिक दुरुस्ती वेळेत पूर्ण करून ट्रिपिंग व खंडाचे प्रमाण कमी करावे. तक्रार निवारण- शेतकऱ्यांच्या वीज तुटणे, कमी दाब अशा तक्रारी तातडीने सोडवण्यासाठी स्थानिक पातळीवर यंत्रणा सक्षम करावी. पान २ वर

# पी.बी.ए. स्कूलमध्ये विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प व चॉकलेट देऊन स्वागत

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : पी.बी.ए. इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प व चॉकलेट टॉफी देऊन उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. शाळा प्रशासनाने आगळ्या-वेगळ्या पद्धतीने केलेल्या स्वागतामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

उन्हाळी सुट्टीनंतर शाळेत परतणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पहिला दिवस नेहमीच उत्सुकतेचा असतो. मित्रमंडळी, शिक्षक आणि शाळेच्या वातावरणाची ओढ विद्यार्थ्यांना शाळेकडे आकर्षित करत असते. याच पार्श्वभूमीवर शाळेचे संपूर्ण प्रांगण आकर्षक रांगोळ्या, फुलांच्या पाकळ्या आणि स्वागतपर संदेशांनी सजविण्यात आले होते. प्रवेशद्वारावर तोरणे व फुग्यांच्या आकर्षक कमानी उभारण्यात आल्या होत्या.

विद्यार्थी व पालकांसाठी खास सेल्फी पॉइंट तयार करण्यात आला होता. या ठिकाणी विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी उत्साहाने छायाचित्रे काढली. नर्सरी वर्गही विविध खेळणी व आकर्षक साहित्याने सजविण्यात आला होता. मुख्याध्यापक जे. एस. देवरे व सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प व चॉकलेट देऊन स्वागत केले.कार्यक्रमाची संकल्पना, नियोजन व कलात्मक सजावट कलाशिक्षक अनंत बागल यांनी साकारली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

या उपक्रमासाठी शाळेचे चेअरमन डॉ. संदेश गुजराथी, मुख्याध्यापक जे. एस. देवरे, पर्यवेक्षक महेश माळी, पर्यवेक्षिका मीनाक्षी बारी, व्ही. पी. बडवे, प्रशांत वंजारी, अशोक महाजन, व्ही. एस. अमृतकर, शीतल कुलकर्णी, व्ही. जी. बोरोले, श्वेता कलंत्री, अनिता मराठे, वृषाली बोरसे, वैशाली भोळे तसेच सर्व शिक्षक व कर्मचारी वर्ग यांचे सहकार्य लाभले.







अमळनेर : पी.बी.ए. इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या हस्ते फीत कापून त्यांचे स्वागत करण्यात आले. दुसऱ्या छायाचित्रात प्रताप हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांना शालेयपयोगी साहित्य देवून त्यांचे स्वागत करताना शिक्षक वृंद व कर्मचारी.

# प्रताप हायस्कूलमध्ये प्रवेशोत्सव : ११८ व्या वर्षाकडे वाटचाल

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील प्रताप हायस्कूलमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी शाळा प्रवेशोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. नवागत विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प व चॉकलेट देऊन स्वागत करण्यात आले. शाळेच्या परिसरात रांगोळी, पताका सजावट व विविध संदेशपर फलकांमुळे उत्सवी वातावरण निर्माण झाले होते.प्रवेशोत्सवानिमित्त शाळेचे चेअरमन नीरज अग्रवाल, कार्योपाध्यक्ष जितेंद्र जैन, भांडारकर शाळेचे चेअरमन प्रदीप अग्रवाल, मुख्याध्यापिका श्रीमती एस. पी. बावीस्कर तसेच शिक्षक प्रतिनिधी डी. एन. पालवे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यानंतर शालेय प्रार्थना व राष्ट्रगीत झाले. प्रताप शेठजी, साने गुरुजी व सरस्वतीमातेच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका श्रीमती बावीस्कर यांनी केले. यावेळी अमळनेर शहरातील विविध दात्यांनी उपलब्ध करून दिलेल्या शैक्षणिक साहित्याचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. तसेच सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, सहा वहींचा संच, कंपास पेटी, दप्तर आणि शालेय गणवेश प्रदान करण्यात आले.

शाळा ११८ व्या वर्षाकडे वाटचाल करीत असल्याने प्रवेशोत्सवाला पालकांनीही मोठी उपस्थिती दर्शविली. साहित्य वितरणाचे नियोजन एन. आर. पाटील, सचिन अहिरे, नम्रता दोरकर, जयश्री पाटील, सागर पवार आणि प्रसाद गोसावी यांनी पाहिले. शिस्त व्यवस्थेची जबाबदारी लक्ष्मण पाटील व के. जी. कोळी यांनी सांभाळली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस. ए. खांजोडकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन डी. एन. पालवे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

गर्व से कहो स्वदेशी है हम...!
स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

## संपादकीय



# गृहिणींना पगार देणार का?

गृहिणीचा आदर करण्यासाठी होम मेकर' हा शब्द रूढ झाला होता. त्यानंतर तिच्यासाठी 'डोमेस्टिक इंजिनीअर' असा शब्दही वापरण्यात येऊ लागला, गृहिणींना 'नेशन बिल्डर' म्हणून संबोधावे. त्यांना पगार देण्याचा विचारही व्हावा, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. खरेच आपण तो देणार का? सर्वोच्च न्यायालयाचे हे विधान म्हणजे स्त्री–पुरुष समतेचा व न्यायाचा विचार आहे. परिवर्तनाच्या दिशेने टाकलेले पाऊल आहे. स्त्री–वर्गासाठी आश्वासन व दिलासा देणारे आहे.खासदार सरोज खापर्डे यांनी गृहिणींना घरगुती कामातून सक्तीचे साप्ताहिक सुट्टी देणारे विधेयक राज्यसभेत १९९६ मध्ये मांडले होते. पण भारतीय घरांमध्ये त्याची अंमलबजावणी अशक्य मानल्यामुळे ते मंजूर झाले नाही, या विधेयकाची चेष्टाही खूप झाली. गृहिणी आरामखुर्चीत वाचत बसली आहे, बिचारा नवरा घराच्या मध्यभागी गोंधळून उभा आहे, दूध उतू जात आहे, छोटे मुल रडत आहे, असे कार्टून आर. के. लक्ष्मण यांनी काढले होते. महिलांनीही साप्ताहिक सुट्टी घेऊन दुसऱ्या दिवशी आम्हाला डबल काम करायचे नाही, असे म्हणत विधेयकाकडे पाठ फिरवली. न्या. संजय करोल व न्या. कोटीश्वर सिंह यांच्या खंडपीठाने परत एकदा या प्रश्नाला एका केसच्या निमित्ताने वाचा फोडली आहे.गृहिणी घरासाठी राबते, सर्वात आधी ती उठते व सगळे झोपल्यानंतर झोपते, दिवसभर ती करत असलेल्या कामात स्वयंपाक, भांडी, केरवारे घर नेटके ठेवणे, कपडे मशीनला लावणे, इस्त्री करणे अशा अनेक कामांचा समावेश आहे, आजच्या शिक्षित गृहिणीला मुलांना शाळेला पोहोचवणे, आणणे त्यांचा अभ्यास घेणे, बँकांची कामेही करावी लागतात. याशिवाय घरी येणारे पाहुणे, ज्येष्ठ नागरिक, घरातल्यांची आजारपणे अशी अतिरिक्त कामेही ती करते, या सर्व कामात व्यवस्थापन, नियोजन, बचत अशी सर्व कौशल्ये आहेत. पण या कामाचा मोबदला तिला मिळत नाही. गृहिणी घरासाठी अविरत राबत असते. एखादा कामगार कंपनीत गेला नाही तर कारखाना बंद होत नाही. पण, गृहिणीने सुट्टी घेतली तर सर्व घर ठप्प होते. गृहिणी कधीही स्वयंपाकाचे एवढे पैसे द्या, इस्त्रीचे एवढे पैसे द्या, असे मागत नाही. तिने दुपारी विश्रांती घेतली तर दिवसभर काय झोपा काढत होती, म्हणून तिला हिणवले जाते.गृहिणीचे काम हे बायकी काम व ज्याला बुद्धी लागत नाही, असे मानले जाते. माझ्या महाविद्यालयात आईने रविवारी सुट्टी घेतली तर काय कराल? असे मी विद्यार्थ्यांना विचारले तर त्यांच्याकडे उत्तर नव्हते, एक विद्यार्थी उत्साहाने आम्ही हॉटेलमध्ये जेवायला जाऊ व आईलाही बरोबर घेऊन जाऊ असं म्हणाला. तेव्हा समाजातील गृहिणींबद्दलच्या मानसिकतेची मला चिंता वाटली, आईला इतके गृहित धरायचे की तिला बरोबर जेवायला घेऊन जाणे म्हणजे तिच्यावर उपकारच करत असल्याची भावना व्यक्त होते. सर्वोच्च न्यायालयाने गृहिणीला 'नेशन बिल्डर' म्हटले, गृहिणीच्या कामाचा मोबदला तीस हजार रुपये सांगितला, तिच्या घरातील कामाला कमी लेखू नये किंवा प्रतिकात्मक मानू नये, असा इशाराही सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.

महात्मा फुलेंनी शिक्षणाविषयी बोलताना म्हटले होते, 'एक पुरुष शिकला तर तो एकटाच शिकतो पण महिला शिकली तर अख्खं घर शिकून शहाणे होते.' हे खरे आहे. सर्वोच्च न्यायालयाने गृहिणीला 'नेशन बिल्डर' म्हणताना गृहिणी कुटुंबाचा पाया मजबूत करते, पुढची पिढी घडवते, समाजाच्या विकासात तिचे योगदान महत्त्वाचे आहे, असेही म्हटले आहे.घरकाम कोणी करायचे, वाटून घ्यायचे की नाही?

१. आजही घरकाम हे गृहिणीचेच मानले जाते. आठ तास नोकरी करून आल्यावरही पदर खोचून त्या किचन कामात जुंपून घेतात. आता यात काही प्रमाणात बदल होत आहेत. दमून आलेल्या पत्नीला चहा देणे, कुकर लावणे, ही कामे पुरुष करत आहेत. पण इच्छा नसल्यास ही कामे ते टाळूही शकतात.

२. महिलेला घरातील सर्व कामे पूर्ण करावीच लागतात. सध्याची कुटुंबव्यवस्था ही पुरुषांसाठी हितकारक असल्याने त्यातले फायदे पुरुष वर्गाला गमवायचे नाहीत. गृहिणीने घरातील कामाचे विभाजन केले पाहिजे, पण तीही याच समाजरचनेचा घटक असल्याने मुलीला सर्व कामे शिकवते व तिला ती करायला लावते.

३. मुलगा मात्र 'बॉईज डोन्ट वर्क' म्हणत वडिलांचे अनुकरण करत बाईला कामे सांगत राहतो. पुरुषांनी पाणी भरणे, भाजी आणणे अशी कामे केली तर महिलांनी त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. अन्यथा पुरुषांना पळवाट काढायला संधी मिळते. पुरुषांनाही घरकाम शिकवले व सांगितले पाहिजे.

४. सर्वोच्च न्यायालयाने गृहिणीसाठी काही मार्गदर्शक तत्वेही जारी केली आहेत. गृहिणीच्या कामाची दखल घेताना तिच्या मोबदल्याचे मूल्यांकन करावे. त्यासाठी तिचे वय, शिक्षण, कौशल्ये, कौटुंबिक जबाबदाऱ्या, आर्थिक परिस्थिती या साऱ्याचा विचार केला जावा, असे न्यायालयाने म्हटले आहे.

## शेती पंपांसाठी शेतकऱ्यांना अखंड वीज द्या

पान १ वरून

यावेळी आ. अनिलदादा पाटील म्हणाले की, "शेतकरी हा देशाचा कणा आहे. पेरणीच्या काळात त्यांना वीजेची सर्वाधिक गरज असते. त्यामुळे महावितरणने शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य द्यावे.महावितरण अधिकाऱ्यांनी आमदारांच्या सूचनांची नोंद घेत लवकरात लवकर अंमलबजावणी करण्याचे आश्वासन दिले. या बैठकीमुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# वडापाव, भजी वर्तमानपत्रात गुंडाळणे का धोकादायक?

## आयुक्त तुकाराम मुंढेंच्या कारवाईनंतर तज्ज्ञांचा इशारा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा




मुंबईतील एका प्रसिद्ध वडापाव विक्रेत्याकडून खाद्यपदार्थ देण्यासाठी वर्तमानपत्राचा वापर केला जात होता. ही बाब निदर्शनात आल्यानंतर भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण पश्चिम विभागाने या विक्रेत्यावर कारवाईचा बडगा उगारला. अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने केलेल्या या धडक कारवाईमुळे खाद्यपदार्थ विक्रेत्यांमध्ये चांगलीच खळबळ उडाली. या पार्श्वभूमीवर वर्तमानपत्रात गुंडाळलेले खाद्यपदार्थ खाल्ल्याने आरोग्यावर नेमके काय परिणाम होतात, असा प्रश्न सध्या चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे, त्याविषयीचा हा आढावा...

**तुकाराम मुंढे यांचा कारवाईचा धडाका**

अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांचा सध्या चांगलाच बोलबाला पाहायला मिळत आहे. काही दिवसांपूर्वी वर्धा जिल्ह्यातील गोरस भंडारवर केलेल्या कारवाईनंतर ते चांगलेच प्रकाशझोतात आले होते. मुंबईत बदली झाल्यानंतरही मुंढे यांनी अनेक ठिकाणी छापा टाकण्याचा सपाटाच लावला आहे. यादरम्यान मुंबईतील एका प्रसिद्ध वडापाव विक्रेता वर्तमानपत्रांच्या कागदात खाद्यपदार्थांची विक्री करत असल्याची बाब त्यांच्या निदर्शनात आली. त्यानंतर मुंढे यांनी तातडीने या विक्रेत्यावर कारवाई केली आणि राज्यातील सर्व अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना रस्त्यावरील वडापाव, समोसा, भजी विक्रेते, हॉटेल्स आणि मिठाई दुकानांवर छापे टाकून वृत्तपत्राचा वापर थांबवण्याचे कडक निर्देश दिले.

**वृत्तपत्र आणि अन्नपदार्थांचे धोकादायक नाते**

वर्तमानपत्रांच्या छपाईसाठी वापरल्या जाणाऱ्या शाईमध्ये जड धातूंसह अनेक घातक रसायने असतात. गरम, तेलकट किंवा ओलसर अन्नपदार्थांच्या संपर्कात आल्यास ही रसायने अन्नात मिसळू शकतात. याशिवाय, वर्तमानपत्रे अनेकांच्या हाताळणीतून जात असल्याने तसेच अस्वच्छ वातावरणाच्या संपर्कात येत असल्याने त्यांच्यावर रोगकारक सूक्ष्मजीवही असू शकतात. अशा वर्तमानपत्रांचा अन्नपदार्थांसाठी वापर केल्यास ग्राहकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे विक्रेत्यांनी नागरिकांच्या आरोग्याशी खेळू नये, असा इशारा भारतीय अन्न सुरक्षा विभागाने दिला. वडापाव आणि भजी विक्रेते तसेच हॉटेल व्यावसायिक आणि खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी खाद्यपदार्थ बांधून देण्यासाठी अन्नसुरक्षा मानकांनुसार मंजूर केलेले साहित्य वापरावे, असे आवाहनही एफएसएसएआयने केले.

**वृत्तपत्रातील घातक रसायने अन्नात कशी मिसळतात?**

नवी दिल्लीतील सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या सल्लागार व संसर्ग नियंत्रण अधिकारी यांनी सांगितले की, वर्तमानपत्रांमध्ये वापरल्या जाणाऱ्या शाईमुळे नागरिकांच्या आरोग्याला सर्वात मोठा धोका निर्माण होतो. या शाईमध्ये विविध द्रावके, रंगद्रव्ये, बाइंडर्स आणि विविध रासायनिक घटकांचे मिश्रण असते. तसेच त्यात शिसे, क्रोमियम आणि कॅडमियम यांसारखे घातक जड धातूही असतात. याशिवाय फॅथलेट्स, खनिज तेल आणि विविध कृत्रिम रंगांचाही या शाईमध्ये समावेश असतो. त्यामुळे वडापाव, समोसे, भजी, पकोडे किंवा इतर तळलेले आणि तेलकट पदार्थ वर्तमानपत्रात गुंडाळल्यास नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होतो. गरम, तेलकट किंवा ओलसर अन्नपदार्थ वर्तमानपत्रात गुंडाळल्यास त्यातील उष्णता आणि तेल हे विद्रावकप्रमाणे काम करतात. त्यामुळे शाईमध्ये असलेली रसायने अन्नात मिसळण्याची प्रक्रिया वेगाने घडते, असेही स्पष्ट केले.

**वर्तमानपत्रांमधून जीवाणू आणि संसर्गाचाही धोका**

तज्ज्ञांच्या मते, सतत अशा दूषित अन्नाचे सेवन केल्यास त्याचे शरीरावर अत्यंत गंभीर परिणाम होऊ शकतात. शिसे आणि इतर जड धातू शरीरात सतत गेल्याने मज्जासंस्था आणि मूत्रपिंडांच्या कार्यावर परिणाम होऊ शकतो. विशेषतः लहान मुलांमध्ये बौद्धिक क्षमतेवर आणि मेंदूच्या विकासावर त्याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते. छपाईच्या शाईत वापरले जाणारे अनेक द्रावके आणि रंगद्रव्ये कर्करोगासारख्या गंभीर आजाराला निमंत्रण देऊ शकतात. अशा रसायनांचा अन्नाद्वारे दीर्घकाळ शरीरात प्रवेश होत राहिल्यास चयापचयाशी संबंधित विकार वाढतात आणि विविध प्रकारच्या कर्करोगांचा धोकाही निर्माण होतो. केवळ रासायनिक घटक हा एकमेव धोका नसून, सूक्ष्मजीवांच्या दृष्टीनेही वर्तमानपत्रे धोकादायक ठरू शकतात. छपाई केंद्रापासून ते वितरण एजंट आणि विक्रेत्यांपर्यंत पोहोचण्याच्या प्रवासात वर्तमानपत्रे अनेक प्रकारच्या पृष्ठभागीय दूषित घटकांच्या संपर्कात येतात. तसेच ती धूळ, प्रदूषण आणि विविध स्वच्छता–अस्वच्छतेच्या परिस्थितींना सामोरी जात असल्याने त्यांच्यावर रोगकारक जीवाणू आणि इतर सूक्ष्मजीव असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अशा वर्तमानपत्रांमध्ये अन्नपदार्थ गुंडाळणे किवा वाढणे ग्राहकांच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते.

### विक्रेत्यांनी वर्तमानपत्रांऐवजी काय वापरावे?

या जीवघेण्या धोक्यापासून वाचण्यासाठी विक्रेत्यांना सुरक्षित आणि पर्यावरणपूरक पर्यायांचा वापर करण्याचा सल्ला दिला आहे. फूड–ग्रेड बटर हा पेपर तेलरोधक मानला जातो आणि त्यातील त्यातील रसायने अन्नात विरघळत नाहीत. केळीची स्वच्छ पाने किंवा साळच्या पानांपासून बनवलेल्या पत्रावळी–द्रोण हा एक पारंपरिक, आरोग्यदायी आणि पर्यावरणपूरक पर्याय आहे. उसाच्या चोथ्यापासून तयार केलेल्या पिशव्या खाद्यपदार्थ देण्यासाठी चांगल्या मानल्या जातात. याशिवाय त्या मजबूत, टिकाऊ आणि सहज विघटनशील असतात. अन्नपदार्थ ठेवण्यासाठी विशेष मंजुरी मिळालेले कागदी किवा कार्डबोर्डचे डबेही चांगली मानली जातात. यादरम्यान सर्व प्रकारचे कागदी साहित्य सुरक्षित असते, असा समज चुकीचा असल्याचा इशाराही तज्ञांनी दिला आहे. काही वेळा पुनर्वापर केलेला कागद सामान्य वर्तमानपत्रांपेक्षाही अधिक धोकादायक ठरू शकतो. कारण या कागदावर पुनर्प्रक्रिया करताना जुनी शाई आणि अनेक प्रकारच्या रासायनिक प्रक्रियांचे अंश त्यात शिल्लक राहिलेले असतात. त्यामुळे ग्राहकांच्या आरोग्याच्या सुरक्षेसाठी खाद्यपदार्थांचे पॅकिंग, साठवणूक आणि वाढणी करताना केवळ मान्यताप्राप्त फूड–ग्रेड साहित्याचाच वापर करणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.

# घर सांभाळणाऱ्या महिला किमान ३० हजार रुपये मासिक वेतनाला पात्र!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

## सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण निर्देश



घराची संपूर्ण जबाबदारी सांभाळणाऱ्या गृहिणींच्या कष्टाचा सन्मान करत सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्देश आहेत. "गृहिणी या केवळ घर चालवत नाहीत, तर त्या खर्या अर्थाने 'देश निर्माता' आहेत," असे गौरवद्गार न्यायालयाने काढले आहेत. रस्ते अपघातात एखाद्या गृहिणीचा मृत्यू झाल्यास, तिच्या कुटुंबीयांना दिल्या जाणाऱ्या विमा भरपाईची रक्कम ठरवण्यासाठी तिचे काल्पनिक मासिक उत्पन्न आता किमान ३०,००० रुपये गृहीत धरले पाहिजे, असा आदेश कोर्टाने दिला आहे.

न्यायमूर्ती संजय करोल आणि न्यायमूर्ती एन. कोटिश्वर सिंग यांच्या खंडपीठाने हे निर्देश दिले. आतापर्यंत कोर्टामध्ये गृहिणींच्या कामाची तुलना ही 'कुशल कामगारांच्या' मजुरीशी केली जात होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने ही जुनी पद्धत पूर्णपणे फेटाळून लावली. गृहिणी दिवसभर घरात जे प्रेम, काळजी आणि कष्ट देतात, त्याचे मूल्य केवळ बाजारातील मजुरीच्या दराने ठरवले जाऊ शकत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

**२३ वर्षांच्या प्रदीर्घ लढ्यानंतर न्याय**

हा निर्णय पंजाबमधील एका जुन्या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान आला. नोव्हेंबर २००१ मध्ये रेश्मा नावाच्या एका महिलेचा रस्ते अपघातात मृत्यू झाला होता. तिच्या पतीने आणि तीन मुलांनी नुकसानभरपाईसाठी कोर्टात धाव घेतली होती. मात्र, हे प्रकरण तब्बल २३ वर्षे न्यायालयात रखडले. शेवटी डिसेंबर २०२४ मध्ये हायकोर्टाने यावर निर्णय दिला आणि आता २०२६ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने यावर अंतिम शिक्कामोर्तब केले. एका कुटुंबाला नुकसानभरपाई मिळवण्यासाठी दोन दशकांहून अधिक काळ वाट पाहावी लागली, याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने तीव्र चिंता व्यक्त केली.

**वर्षाच्या आत खटले निकाली काढण्याचे आदेश**

अशा प्रकरणांमध्ये होणारा उशीर हा अपघातग्रस्तांच्या कुटुंबावर अन्याय करणारा आहे, असे सांगत सर्वोच्च न्यायालयाने देशातील सर्व उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायमूर्तींना एक महत्त्वाचा आदेश दिला. "रस्ते अपघातातील भरपाईचे दावे साधारणपणे एका वर्षाच्या आत निकाली काढले पाहिजेत," असे खंडपीठाने स्पष्ट केले. यासाठी योग्य ते प्रशासकीय नियम आणि दिशा–निर्देश जारी करण्याची विनंतीही न्यायालयाने केली आहे.

**निर्णयाचे काय परिणाम होणार?**

या ऐतिहासिक निर्णयामुळे आता रस्ते अपघातात मृत्यू झालेल्या गृहिणींच्या कुटुंबांना मिळणाऱ्या विमा भरपाईच्या रकमेत लक्षणीय वाढ होणार आहे. गृहिणींच्या न दिसणाऱ्या, विनामोबदला केलेल्या कामाला पहिल्यांदाच अशा प्रकारे थेट आर्थिक मूल्य किमान ३०,००० रुपये प्रति महिना देण्यात आले आहे. यापूर्वीच्या 'प्रणय सेठी' खटल्यातील नियमांसोबतच आता हा नवीन नियम जोडूनच देशातील सर्व अपघात लवाद भरपाईची रक्कम ठरवतील. हा निर्णय केवळ विम्याच्या पैशांपुरता मर्यादित नसून, देशातील कोट्यवधी महिलांच्या घरगुती कष्टाला आणि त्यांच्या अस्तित्वाला समाजात मानाचे स्थान देणारा ठरला आहे.



*अमळनेर : पाणीपुरवठा सुरळीत व वेळेत करण्याच्या मागणीचे निवेदन पालिका अधिकाऱ्याकडे देताना वॉर्ड क्र. ७ मधील महिला भगिनी.*

## वामननगरवासीयांची पाण्यासाठी पालिकेकडे हाक; पिंपळे रोडवरून पाणीपुरवठा करण्याची मागणी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : वामननगर आणि पिंपळे रोड परिसरातील नागरिकांना गेल्या काही दिवसांपासून तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर वार्ड क्रमांक ७ मधील नागरिकांनी अमळनेर नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा विभागाचे सभापती व स्थानिक नगरसेवकांना लेखी निवेदन देऊन तातडीने पाणी पुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली आहे.

गेल्या दोन आठवड्यांपासून या भागात नळांना पाणीच येत नसल्याने उन्हाळ्याच्या तीव्र झळा सोसणाऱ्या नागरिकांचे हाल होत आहेत. येथील कर्मचाऱ्यांकडे ) विचारणा केली असता, 'शेवटच्या १० ते १५ घरांपर्यंत पाणी पोहोचणार नाही' असे उडवाउडवीचे उत्तर मिळत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

सध्या होत असलेला पाणी पुरवठा अपूर्ण आणि विस्कळीत असल्याने, वामननगर भागासाठी पिंपळे रोडच्या मुख्य वाहिनीकडून स्वतंत्र पाणी पुरवठा मंजूर करून तो जोडण्यात यावा, अशी मागणी नागरिकांनी अर्जाद्वारे केली आहे. संबंधित कर्मचारी संतोष साळुंके यांच्याकडून पाणी न पोहोचण्याच्या कारणांचा प्रशासनाने तातडीने आढावा घ्यावा, असेही निवेदनात म्हटले आहे.

सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने पाण्याचा वापर वाढला आहे. अशा स्थितीत पाणीच येत नसल्याने गृहिणींना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. प्रशासनाने यावर त्वरित तोडगा न काढल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही परिसरातील नागरिकांनी दिला आहे.

या निवेदनावर जिजाबराव देवरे, निंबा पाटील, दंगल शेवाळे, वाल्मिक पाटील, ज्ञानेश्वर बाविस्कर, विजय पाटील, अनिल चौधरी, ताराचंद पाटील, विकास पाटील, राजेंद्र नेरकर, राजेश्वर नेरकर, समाधान नेरकर, वैष्णवी पाटील आणि राजेंद्र सोनवणे यांच्यासह वार्ड क्र. ७ मधील असंख्य नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# तांब्याच्या बाटलीतून दिवसभर पाणी पिणे योग्य की अयोग्य?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

## जाणून घ्या फायदे अन् तोटे...



आरोग्याबाबत जागरूक असलेले अनेक लोक हल्ली तांब्याच्या बाटलीतून पाणी पिताना दिसतात. आयुर्वेदातही तांब्याच्या भांड्यातील पाणी आरोग्यासाठी फायदेशीर मानले जाते. पण, दिवसभर तांब्याच्या भांड्यातील पाणी पिणं कितपत फायदेशीर आहे ते जाणून घेऊ....

तांब्याच्या बाटलीतील पाणी प्यायल्याने शरीरातील विषारी घटक बाहेर काढण्यास, रोगप्रतिकार शक्ती वाढविण्यास आणि पचनसंस्था मजबूत करण्यास मदत होते, असे मानले जाते. त्यामुळे बाजारातही तांब्याच्या बाटल्यांना मोठी मागणी असते. मात्र, या सवयीचे फायदे जितके महत्त्वाचे आहेत, तितकाच त्याचा योग्य रीतीने वापर करणेही गरजेचे आहे. चुकीच्या पद्धतीने किंवा अति प्रमाणात सेवन केल्यास त्याचे दुष्परिणामही होऊ शकतात.

तांब्याच्या भांड्यातून पाणी पाण्याचे फायदे

तांब्याच्या बाटलीत काही तास ठेवलेले पाणी आरोग्यासाठी अनेक प्रकारे उपयुक्त ठरू शकते.शरीरातील विषारी घटक बाहेर टाकण्यास मदत होते.

पचनसंस्था अधिक कार्यक्षम बनण्यास मदत मिळू शकते.पोटाशी संबंधित काही समस्या कमी होण्यास मदत होते.रोगप्रतिकार शक्ती मजबूत होण्यास मदत होते.तांब्यामधील अँटी–बॅक्टेरियल गुणधर्म पाण्याची गुणवत्ता सुधारण्यास मदत करतात.त्वचा निरोगी आणि तेजस्वी ठेवण्यास मदत मिळू शकते.

**तांब्याच्या बाटलीचा योग्य वापर कसा करावा?**

तांब्याच्या बाटलीचा योग्य पद्धतीने वापर केल्यास त्याचे अधिक फायदे मिळू शकतात.

पाणी किमान ६ ते ८ तास तांब्याच्या बाटलीत साठवून ठेवावे.सकाळी रिकाम्या पोटी हे पाणी पिणे अधिक लाभदायक मानले जाते. दिवसभर फक्त तांब्याच्याच पाण्यावर अवलंबून राहू नये.बाटलीची नियमित स्वच्छता करणे आवश्यक आहे.स्वच्छ आणि शुद्ध पाण्याचाच वापर करावा.

**तांब्याच्या भांड्यातील पाण्याबाबत घ्यावयाची काळजी**

तांब्याचे पाणी मर्यादित प्रमाणातच सेवन करणे योग्य ठरते. अति प्रमाणात सेवन केल्यास शरीरावर नकारात्मक परिणाम होऊ शकतात.

ॲसिडिटी, यकृताशी संबंधित समस्या किंवा इतर गंभीर आजार असलेल्या व्यक्तींनी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

दीर्घकाळ पाणी बाटलीत साठवून ठेवू नये.बाटली स्वच्छ न ठेवल्यास जंतू वाढू शकतात.कोणतीही आरोग्य समस्या असल्यास तज्ज्ञांचा सल्ला घेऊनच तांब्याच्या भांड्यातील पाणी नियमितपणे सेवन करावे.तांब्याच्या भांड्यातील पाणी योग्य प्रमाणात आणि योग्य पद्धतीने सेवन केल्यास आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकते. मात्र, दिवसभर केवळ तांब्याच्याच भांड्यातील पाणी पिणे टाळावे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# ईंट भट्ठों पर काम करने से लेकर आयएएस बनने का सफर

## शादी के १७ साल बाद क्रैक किया यूपीएससी एग्जाम



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

गर आप सच्ची लगन और परिश्रम करते हैं तो सपने देखनी की कोई निर्धारित उम्र नहीं होती है। आप जिंदगी के किसी भी पड़ाव में अपने सपने को साकार कर सकते हैं। आज एक ऐसी ही कहानी हम आपके सामने पेश करने जा रहे हैं जो गणपत कृष्णा यादव की है। इन्होंने आर्थिक तंगी के कारण ऊंटगाड़ी पर ईंटें ढोने का काम किया लेकिन हौसले मजबूत रखे।

उनकी जिंदगी में एक ऐसा भी समय आया जब लोगों की बातें और ताने सुनकर गांव में घर से बाहर निकलना भी मुश्किल हो गया था। पत्नी, बच्चे और घर-परिवार की जिम्मेदारियों को संभालने के साथ-साथ उन्होंने एक सपना देखा। वो सपना था यूपीएससी एग्जाम क्लियर करने का। आखिरकार शादी के १७ सालों के बाद वह अफसर बने आज उनकी कहानी युवाओं के लिए एक मिसाल है।

**किसी भी हालात में ऊंटगाड़ी पर ईंटें ढ़ोने का काम किया**

अपने संघर्ष की कहानी के बारें में बताते हुए गणपत कृष्णा यादव ने कहा कि उनके घर में कोई पढ़ा-लिखा नहीं था। उनकी पीढ़ी से ही पढ़ाई-लिखाई शुरुआत हुई है। उनके पिता ईंट के भट्ठों पर काम करने जाते थे तो वह भी उनके साथ जाते थे। किसी भी हालात में ऊंट गाड़ी पर ईंट ढोने के काम करते थे। पढ़ाई के साथ-साथ वह ये काम करते थे। उनके परिवार के लगभग सभी बच्चे अलग-अलग काम करते थे।

**१० वीं पास करते ही परिवारवालों ने करवा दी शादी**

गणपत कृष्णा यादव ने बताया कि सरकारी स्कूल से पढ़ाई करते हुए उन्होंने १० वीं की परीक्षा में अच्छे अंक हासिल किए थे। कुछ दिनों बाद ही उनके पिता ने गणपत की शादी करवा दी। लेकिन शादी के बाद भी उन्होंने अपनी पढ़ाई को जारी रखा।

गणपत ने बताया कि जिंदगी में एक ऐसा भी वक्त आया जब वह खेती के साथ अपने भाई के कोचिंग इंस्टीट्यूट जाना शुरू कर दिया था। हालांकि, उनके गांव के लोगों ने जानबूझकर सवाल पूछकर परेशान करना शुरू कर दिया। उनका गांव में निकलना मुश्किल हो गया था। जबरदस्ती घरवालों से भी सवाल-जवाब करने लगते और यही वजह थी कि लोगों ने उनसे ठीक से बात भी करना बंद कर दिया था।

**यूपीएससी एग्जाम में ५ बार असफल होने के बाद भी नहीं मानी हार**

गणपत कृष्णा यादव ने अपनी पढ़ाई जारी रखी। पहले प्रयास में जीएस में कम नंबर थे और दूसरे प्रयास में वह फेल हो गए। वह फोकस नहीं कर पा रहे थे और असफलता मिली। वह यूपीएससी के एग्जाम में ५ बार फेल हुए लेकिन उन्होंने हार नहीं मानी।

**इंजीनियर की जॉब छोड़कर वापस आ गए गांव**

१२ वीं के बाद इंजीनियरिंग की पढ़ाई करने के बाद उनकी जॉब लग गई। वह अपने घर पर रुपये भेजने लगे। अपने परिवार और बेटी की जिम्मेदारी निभाते हुए अचानक उन्होंने नौकरी छोड़ने का फैसला कर लिया। वापस गांव आ गए और जैविक खेती शुरू कर दी। हालांकि, यह फैसला कठिन था लेकिन अपनों सपनों के लिए उन्होंने ऐसा फैसला कर लिया।

**शादी के १७ सालों के बाद यूपीएससी के ६ वें प्रयास में सफलता लगी हाथ**

बार-बार असफलताओं और तैयारी के बीच गणपत की बेटियां बड़ी हो गई थीं। इसके बाद वह जयपुर गए और वहां से तैयारी की। सिलेबस पूरा करने के बाद मॉक टेस्ट और टॉपर्स स्ट्रैटेजी पर फोकस किया।

२०२२ में शादी के १७ बाद उन्होंने अपने छठे प्रयास में यूपीएससी की परीक्षा क्रैक की और फिर बन गए। उनकी ज्वाइनिंग इंडियन रेलवे प्रोटेक्शन फोर्स सर्विस (आयआरपीएफएस) में असिस्टेंट सेक्योरिटी कमिश्नर (एएससी) के तौर पर हुई थी, जो ग्रुप-ए राजपत्रित अधिकारी रैंक होती है।

# शारण्याने तयार केले शेतकऱ्यांसाठी स्मार्ट, व्हॉईस-एनेबल ॲप

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

शारण्या मेहता ही फक्त एक इयत्ता बारावीची विद्यार्थिनी आहे. पण तिने केलेल्या कामामुळे ग्रामीण शेतकऱ्यांच्या आयुष्यात मोठा बदल घडवून आणला आहे. अलवरमध्ये लहानपणापासून शेतकऱ्यांच्या पाण्याच्या व्यवस्थेसंबंधी समस्या पाहून तिला या क्षेत्रात काहीतरी उपयुक्त करण्याची प्रेरणा मिळाली. ती इयत्ता नववीमध्ये असतानाच तिने 'प्रोजेक्ट जल' सुरू केले. ज्यामध्ये चेक डॅम्सचा अभ्यास करून पाण्याची साठवण क्षमता समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्या अनुभवातून तिला लक्षात आले, की शेतकऱ्यांना वेळेवर आणि अचूक पाणी देण्याचे मार्गदर्शन मिळाले तर पिकांची गुणवत्ता सुधारू शकते आणि खर्चही कमी होऊ शकतो.

शारण्याने तयार केलेली डिसीजन सपोर्ट सिस्टीम (डीएसएस) हे एक स्मार्ट, व्हॉईस-एनेबल ॲप आहे जे शेतकऱ्यांना पाण्याचे नियोजन करण्यास मदत करते. या प्रणालीमध्ये मातीतील आर्द्रतेसाठी सेंसर्स, उपग्रह डेटा, हवामान अंदाज आणि शेतकऱ्यांचे अनुभव यांचा समावेश आहे. मातीतील आर्द्रता मोजण्यासाठी ३० सें.मी. आणि ३०६० सें.मी. खोलीत कॅपेसिटिव्ह व टीडीआर सेंसर्स लावले जातात. तसेच इस्रोच्या भुवन प्लॅटफॉर्म आणि सेंटिनेल-२ इमेजरीचा वापर



करून वनस्पतींच्या आरोग्याचा अंदाज घेतला जातो.

ॲपमध्ये हवामान अंदाजही समाविष्ट आहेत. ज्यामध्ये पर्जन्यमान, तापमान, वारा आणि जलवाष्पीकरणाचा डेटा वापरून पाणी देण्याची गरज ठरवली जाते. संपूर्ण डेटा एडब्ल्यूएस किंवा 'एझ्यूर'सारख्या क्लाउड सर्व्हरवर पायथॉनPython आणि Node.js च्या मदतीने प्रक्रिया केली जाते. ज्यामुळे शेतकऱ्यांना अचूक आणि वेळेवर सूचना मिळतात. या ॲपद्वारे शेतकऱ्यांना कधी पाणी द्यावे, किती पाणी द्यावे आणि सर्वोत्तम वेळ कोणती याची माहिती व्हॉईस कमांडद्वारे मिळते, जेणेकरून कमी साक्षर असलेले शेतकरीही सहज फायदा घेऊ शकतात.

शारण्याच्या या उपक्रमामुळे मांडौरा, सोनिपत मधील शेतकऱ्यांना पाणी व इंधनाची बचत होत आहे, तसेच पिकांचे आरोग्य सुधारले आहे. तिचा हा उपक्रम फक्त तंत्रज्ञानाचा वापर करून शेतकऱ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवतो, तर शाश्वत शेतीसाठीही एक आदर्श उदाहरण ठरतो. शारण्याची ही कथा दाखवते, की जर योग्य दृष्टिकोन आणि कर्तृत्व असले तर वय कितीही कमी असलं तरी समाजात मोठा बदल घडविता येतो.

शारण्याने दाखविले की नवकल्पना, तंत्रज्ञान आणि संवेदनशीलता यांचा संगम करून शेतकरी आणि पर्यावरण दोघांचेही हित साधले जाऊ शकते. तिची मेहनत आणि दृढनिश्चय ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी नवी दिशा ठरवतो, आणि भविष्यात अशा प्रकारच्या उपक्रमांनी भारतातील शेतीला आधुनिक



# जिलेबीचे इंग्रजी नाव काय?

## जाणून घ्या 'या' गोड पदार्थाची खास ओळख

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

जिलेबी ही भारतातील सर्वांत लोकप्रिय मिठाईंपैकी एक आहे. सण, लग्नसमारंभ आणि खास प्रसंगी आवडीने खाल्ली जाते. जिलेबी भारतासोबत पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ आणि काही आफ्रिकन देशांमध्येही लोकप्रिय आहे.

इंग्रजीमध्ये जिलेबीला सामान्यतः 'Sweet Pretzel' किंवा 'Coiled Funnel Cake' असेही म्हटले जाते. बाहेरून कुरकुरीत आणि आतून रसाळ असलेल्या जिलेबीला काही ठिकाणी 'Indian Syrup-Coated Dessert' असेही म्हटले जाते. जिलेबीचा उगम मध्यपूर्वेत झाला असे मानले जाते. जेथे तिला 'Zulabiya' किंवा 'Zalabiya' असे म्हणत. भारतातील काही राज्यांत जिलेबी दुधासोबत खाल्ली जाते. हिवाळ्यात जिलेबी अधिक खाल्ली जाते. कारण त्यात उबदारपणा आणि गोडवा दोन्ही असतो.

३० जुलै रोजी 'World Jalebi Day' साजरा केला जातो. या दिवशी अनेक मिठाई दुकाने आणि खाद्यप्रेमी जिलेबीबद्दलचे आपले प्रेम व्यक्त करतात.
भारतात जिलेबी प्रामुख्याने गोड पदार्थ म्हणून खाल्ली जाते. पण काही भागांत लोक ती पोहे किंवा समोशासोबत नाश्त्यातही खातात.

# महिनाभरातच गॅस सिलिंडर संपतो?

## स्वयंपाक करताना 'या' ३ सवयी बदला, सिलिंडर चालेल ४० दिवस

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

महिना संपायच्या आतच गॅस सिलिंडर संपतोय का? महागाईच्या काळात दर महिन्याला गॅसवर होणारा हा खर्च घरचं बजेट कोलमडवून टाकतो. अनेकदा आपण गॅस वाचवण्यासाठी प्रयत्न करतो, पण स्वयंपाक घरातील काही नकळत होणाऱ्या चुकांमुळे गॅस वाया जातो. आज आम्ही तुम्हाला अशा ३ सोप्या सवयी सांगणार आहोत, ज्या बदलल्यास तुमचा ३० दिवस चालणारा सिलिंडर थेट ४० दिवस चालेल आणि पैशांचीही मोठी बचत होईल.

आजच्या काळात वाढत्या महागाईमुळे घरखर्च सांभाळणे अनेक कुटुंबांसाठी मोठे आव्हान बनले आहे. त्यातच एलपीजी गॅस सिलिंडरच्या वाढत्या किंमतींमुळे गृहिणींचे बजेट आणखी बिघडते. अनेकांच्या घरी गॅस सिलिंडर अवघ्या महिन्याभरात संपतो आणि पुन्हा नवीन सिलिंडर घ्यावा लागतो. मात्र, काही छोट्या-छोट्या सवयी बदलल्या तर गॅसचा वापर कमी होऊ शकतो आणि सिलिंडरचे आयुष्य ३० दिवसांवरून ४० दिवसांपर्यंत वाढू शकते. स्वयंपाक करताना नकळत होणाऱ्या काही चुका गॅसचा अपव्यय वाढवतात. या चुका टाळल्यास केवळ पैशांची बचतच होणार नाही, तर इंधनाचाही योग्य वापर होईल. जाणून घेऊया अशाच तीन महत्त्वाच्या सवयी ज्या बदलल्यास गॅस सिलिंडर जास्त काळ टिकू शकतो.

**भांडी गॅसवर ठेवण्यापूर्वी सर्व तयारी पूर्ण करा**

अनेकदा आपण गॅस सुरू करून भांडे ठेवतो आणि त्यानंतर भाज्या चिरणे, मसाले काढणे किंवा इतर तयारी करायला सुरुवात करतो. या काळात गॅस सतत जळत राहतो आणि त्याचा विनाकारण वापर होतो. स्वयंपाक सुरू करण्यापूर्वी सर्व साहित्य तयार ठेवणे ही सर्वात महत्त्वाची सवय आहे. भाज्या, मसाले, तेल, डाळी किंवा इतर लागणारे पदार्थ आधीच तयार करून ठेवल्यास गॅसचा वेळ वाचतो. यामुळे स्वयंपाक जलद होतो आणि इंधनाचा अपव्यय टाळता येतो. विशेषतः सकाळच्या घाईत अनेकजण गॅस सुरू ठेवून इतर कामे करतात. ही सवय बदलल्यास



दररोज काही मिनिटांचा गॅस वाचू शकतो. महिनाभरात ही बचत लक्षणीय ठरते.

**प्रेशर कुकरचा अधिक वापर करा**

भारतीय स्वयंपाकघरातील प्रेशर कुकर हा गॅस बचतीचा सर्वोत्तम साथीदार मानला जातो. डाळ, भात, कडधान्ये, बटाटे आणि अनेक भाज्या कुकरमध्ये शिजवल्यास त्यासाठी लागणारा वेळ मोठ्या प्रमाणात कमी होतो.साधारण भांड्यात डाळ शिजवण्यासाठी ३० ते ४० मिनिटे लागू शकतात, तर प्रेशर कुकरमध्ये ती काही शिट्ट्यांमध्ये तयार होते. त्यामुळे गॅसचा वापर कमी होतो. अनेक तज्ज्ञांच्या मते, कुकरचा नियमित वापर केल्यास इंधनाची ३० ते ५० टक्के बचत होऊ शकते.तसेच, कुकरमध्ये एकाच वेळी दोन-तीन पदार्थ शिजवण्याची पद्धत वापरल्यास आणखी गॅस वाचतो. उदाहरणार्थ, खाली डाळ आणि वरच्या भांड्यात भात शिजवता येतो. यामुळे वेळ आणि इंधन दोन्हीची बचत होते.

**भांड्यांवर झाकण वापरण्याची सवय लावा**

गॅस वाचवण्याचा सर्वात सोपा आणि प्रभावी उपाय म्हणजे स्वयंपाक करताना भांड्यावर झाकण ठेवणे. झाकण नसल्यास उष्णता बाहेर निघून जाते आणि पदार्थ शिजण्यासाठी अधिक वेळ लागतो. परिणामी गॅसचा वापर वाढतो. डाळ, भात, भाजी किंवा पाणी गरम करताना झाकण लावल्यास उष्णता भांड्यातच राहते. त्यामुळे पदार्थ लवकर शिजतात आणि गॅस कमी खर्च होतो. अनेक संशोधनांनुसार झाकण वापरल्याने स्वयंपाकाचा वेळ २० ते ३० टक्यांपर्यंत कमी होऊ शकतो. याशिवाय, योग्य आकाराचे भांडे वापरणे देखील महत्त्वाचे आहे. लहान बर्नरवर मोठे भांडे ठेवल्यास किंवा मोठ्या बर्नरवर लहान भांडे वापरल्यास उष्णतेचा अपव्यय होतो. त्यामुळे भांड्याच्या आकारानुसार बर्नर निवडणे फायदेशीर ठरते.

**फ्रीजमधील पदार्थ आधी बाहेर काढा**

फ्रीजमधून थेट काढलेले पदार्थ गरम करण्यासाठी अधिक ऊर्जा लागते. त्यामुळे स्वयंपाक करण्यापूर्वी काही वेळ ते बाहेर ठेवावेत. यामुळे शिजण्याचा वेळ कमी होतो.

**गॅस बचतीसाठी काही अतिरिक्त टिप्स**

वरील तीन सवयींबरोबरच काही इतर उपायही गॅस सिलिंडरचे आयुष्य वाढविण्यास मदत करतात.

- बर्नर नियमित स्वच्छ ठेवा.
- बर्नरच्या छिद्रांमध्ये धूळ किंवा अन्नकण अडकल्यास ज्वाला नीट पेटत नाही. त्यामुळे स्वयंपाकाला अधिक वेळ लागतो.
- आठवड्यातून एकदा बर्नर स्वच्छ केल्यास गॅसचा कार्यक्षम वापर होतो.









# गणपतींना ‘बाप्पा’ का म्हणतात?

## काय आहे आध्यात्मिक महत्त्व, धर्मशास्त्रीय आधार आणि भक्तीपर परंपरा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात गणेशभक्त प्रेमाने श्रीगणेश देवांचा ‘गणपती बाप्पा’ असा जयघोष करतात. गणेशोत्सवाच्या काळात ‘गणपती बाप्पा मोरया’ हा नाद सर्वत्र घुमत असतो. परंतु श्रीगणेशांना ‘बाप्पा’ का म्हणतात? या संबोधनामागे केवळ भावनिक जिव्हाळा आहे की त्याला धर्मशास्त्रीय आणि आध्यात्मिक आधारही आहे? या प्रश्नाचे उत्तर भारतीय धर्मपरंपरा, पुराणे, उपासना पद्धती आणि भक्तांच्या अनुभवांमध्ये सापडते.

**‘बाप्पा’ शब्दाचा अर्थ**

‘बाप्पा’ हा शब्द संस्कृत आणि प्राकृत परंपरेतील ‘बाप’, ‘पिता’, ‘पालक’ किंवा ‘आदरणीय श्रेष्ठ पुरुष’ या अर्थांशी संबंधित आहे. महाराष्ट्रात ‘बाप्पा’ हा शब्द अत्यंत आदर, प्रेम आणि वात्सल्य व्यक्त करण्यासाठी वापरला जातो. भक्त श्रीगणेशांना ‘बाप्पा’ म्हणतात. कारण तो भक्तांचा पालनकर्ता, रक्षणकर्ता, मार्गदर्शक आणि संकटांपासून मुक्त करणारा देव मानला जातो. जसा पिता आपल्या मुलांच्या कल्याणाची काळजी घेतो त्याचप्रमाणे गणेश भक्तांच्या जीवनातील विघ्ने दूर करून त्यांचे रक्षण करतो, अशी श्रद्धा आहे.

**धर्मशास्त्रीय आधार**

**१) गणेश म्हणजे सर्व गणांचे अधिपती**

‘गणपती अथर्वशीर्ष’मध्ये म्हटले आहे ‘त्वं गणानां पतिः असि’ अर्थात ‘तू सर्व गणांचा अधिपती आहेस.’

‘गण’ म्हणजे समूह, जीवसमुदाय किंवा दैवी शक्तींचे समुदाय. या सर्वांचा स्वामी म्हणून गणेशाला मान्यता आहे. सर्व जीवांचे नेतृत्व करणारा आणि त्यांचे संरक्षण करणारा म्हणून तो “बाप्पा” म्हणजेच पितृतुल्य मानला जातो.

**२) विघ्नहर्ता आणि मंगलकर्ता**

गणेश पुराण आणि मुद्गल पुराण यामध्ये श्रीगणेशांना ‘विघ्नहर्ता’ आणि ‘सिद्धिदाता’ म्हटले आहे.

धर्मशास्त्रानुसार कोणतेही शुभकार्य सुरू करण्यापूर्वी गणेशपूजन केले जाते. कारण ते अडथळे दूर करणारे आणि कार्यसिद्धी करणारे देव आहेत.

जे आपल्या भक्तांचे संकट दूर करतात, त्यांना लोक सहजपणे ‘बाप्पा’ या प्रेमळ संबोधनाने हाक मारतात.

**३) प्रथमपूज्य देवतेचा मान**

शिवपुराणमध्ये एक प्रसिद्ध आख्यायिका आहे. देवतांमध्ये प्रथम पूजा कोणाची व्हावी याविषयी स्पर्धा झाली असता श्रीगणेशांनी आपल्या माता-पित्यांची प्रदक्षिणा करून संपूर्ण विश्वाची प्रदक्षिणा केल्याचे पुण्य प्राप्त केले. त्यामुळे त्याला प्रथमपूज्यत्व प्राप्त झाले. यातून श्रीगणेश हा केवळ एक देव नसून धर्ममार्गाचा शिक्षक आहे, हे स्पष्ट होते. जो मार्गदर्शक असतो तो समाजाचा आध्यात्मिक पिता मानला जातो.

**अध्यात्मिक महत्त्व**

**१) बुद्धी, विवेक आणि ज्ञानाचा अधिपती**

श्रीगणेशांना ‘बुद्धीची देवता’ मानली जाते. त्यांची उपासना मनुष्याच्या अंतर्मनातील गोंधळ, अस्थिरता आणि अज्ञान दूर करते, अशी श्रद्धा आहे.

अध्यात्मशास्त्रानुसार खरे पिता केवळ जन्म देत नाही तर योग्य दिशा देतात. श्रीगणेश भक्तांना विवेक, संयम आणि योग्य निर्णयक्षमता प्रदान करतात. त्यामुळे ते ‘आध्यात्मिक बाप्पा’ ठरतात.

**२) अहंकाराचा नाश करणारे तत्त्व**

श्रीगणेशांचे विशाल मस्तक ज्ञानाचे, मोठे कान श्रवणशक्तीचे आणि लहान डोळे एकाग्रतेचे प्रतीक मानले जातात. त्याचे संपूर्ण स्वरूप मनुष्याला संदेश देते. अधिक ऐका, कमी बोला, एकाग्र राहा, ज्ञान मिळवा, अहंकाराचा त्याग करा. जो भक्ताला आत्मोन्नतीचा मार्ग दाखवतो, तो गुरुतुल्य आणि पितृतुल्य असतो. म्हणून श्रीगणेशांना ‘बाप्पा’ म्हणणे ही केवळ भावना नसून आध्यात्मिक अनुभूती आहे.

**३) मातृ-पितृभक्तीचे प्रतीक**

श्रीगणेशांच्या जीवनातील सर्वांत महत्त्वाचा संदेश म्हणजे माता-पित्यांप्रती निष्ठा.

माता पार्वती आणि पिता भगवान शिव यांना विश्वस्वरूप मानून त्याने प्रदक्षिणा केली. भारतीय संस्कृतीतील ‘मातृदेवो भव, पितृदेवो भव’ या मूल्यांचे तो जीवंत प्रतीक आहे.

अशा आदर्श पुत्राला भक्त प्रेमाने ‘बाप्पा’ म्हणतात, ही भारतीय भक्तीपरंपरेची वैशिष्ट्यपूर्ण अभिव्यक्ती आहे.



### ‘गणपती बाप्पा मोरया’ या घोषणेचा अर्थ

‘गणपती बाप्पा मोरया’ या घोषणेतील ‘मोरया’ हा शब्द महान गणेशभक्त मोरया गोसावी यांच्या नावाशी जोडला जातो. लोकमान्य परंपरेनुसार या घोषणेचा भावार्थ असा घेतला जातो.

‘हे गणपती बाप्पा, मोरया गोसावींच्या भक्तिभावाप्रमाणे आमच्यावरही कृपा करा.’ यातून श्रीगणेश आणि भक्त यांच्यातील पितृतुल्य नाते अधिक दृढ होते.

**संतपरंपरेतील गणेशभक्ती**

महाराष्ट्रातील संतपरंपरेत श्रीगणेशांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. संत ज्ञानेश्वर यांनी ज्ञानेश्वरीच्या आरंभी गणेशवंदना केली आहे. अनेक संतांनी श्रीगणेशांना मंगलमूर्ती, करुणामूर्ती आणि भक्तवत्सल देव म्हणून गौरविले आहे. ‘भक्तवत्सल’ म्हणजे भक्तांवर पुत्रवत प्रेम करणारा. ही संकल्पना ‘बाप्पा’ या संबोधनाशी थेट संबंधित आहे.

श्रीगणेशांना ‘बाप्पा’ म्हणण्यामागे केवळ भावनिक प्रेम नाही, तर सखोल आध्यात्मिक आणि धर्मशास्त्रीय परंपरा आहे. सर्व गणांचा अधिपती, विघ्नहर्ता, बुद्धीदाता, प्रथमपूज्य देव, भक्तांचा रक्षक आणि मार्गदर्शक म्हणून श्रीगणेशांना पितृतुल्य स्थान प्राप्त झाले आहे. म्हणूनच भक्त त्याला आदर, प्रेम आणि आत्मीयतेने ‘बाप्पा’ म्हणतात. ‘गणपती बाप्पा’ हा शब्द भक्त आणि भगवान यांच्यातील निखळ विश्वास, वात्सल्य आणि संरक्षणाच्या नात्याचे प्रतीक आहे. भारतीय अध्यात्मात देवाला पिता मानण्याची जी परंपरा आहे तिचे सर्वाधिक जीवंत आणि लोकप्रिय रूप म्हणजे ‘गणपती बाप्पा’.

।। गणपती बाप्पा मोरया! मंगलमूर्ती मोरया! ।।

# हनुमानजींची भारतातील ४ प्रसिद्ध मंदिरे

## जेथे झोपलेल्या मुद्रेत आहेत संकटमोचक; एक मंदिर महाराष्ट्रात!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतात मंदिरांची समृद्ध परंपरा आहे आणि विविध देवतांची असंख्य मंदिरे देशभर विखुरलेली आहेत. हिंदू धर्मातील अत्यंत पूजनीय देवतांपैकी एक म्हणजे भगवान हनुमानजी. त्यांना धैर्य, भक्ती, शक्ती आणि निःस्वार्थ सेवेचे प्रतीक मानले जाते. भारतात हनुमानजींची अनेक प्राचीन आणि चमत्कारिक मंदिरे आहेत. बहुतेक ठिकाणी त्यांची मूर्ती उभी किंवा बसलेल्या अवस्थेत दिसते. मात्र, काही दुर्मिळ मंदिरांमध्ये हनुमानजींची मूर्ती झोपलेल्या अवस्थेत आहे. त्यात प्रयागराज, जाम सावली, इटावा आणि खुलदाबाद येथील मंदिरे भक्तांसाठी श्रद्धेचे केंद्र आहेत.

**प्रयागराज येथील मोठा हनुमान मंदिर**

उत्तर प्रदेशातील प्रयागराजमधील संगमाच्या काठावर वसलेले हे मंदिर अत्यंत प्रसिद्ध आहे. येथे हनुमानजींची मूर्ती विश्रांती घेतलेल्या अवस्थेत आहे. लोककथेनुसार लंकेवरील विजय मिळविल्यानंतर थकवा घालविण्यासाठी हनुमानजी येथे विसावले होते. विशेष म्हणजे दरवर्षी गंगेचे पाणी मंदिराच्या गर्भगृहात येऊन हनुमानजींच्या चरणांना स्पर्श करते. स्थानिकांच्या मते हा हनुमानजींचा पवित्र स्नान समजला जातो.

**जाम सावली येथील हनुमान मंदिर**


मध्य प्रदेशातील छिंदवाडा जिल्ह्यातील जाम सावली येथे असलेले हे मंदिर अत्यंत प्राचीन व सिद्ध स्थळ मानले जाते. येथे पिंपळाच्या झाडाखाली हनुमानजींची मूर्ती झोपलेल्या अवस्थेत आहे. या मूर्तीच्या नाभीमधून पाण्याची एक धार सतत वाहताना दिसते, जी प्रसाद म्हणून भक्त घेतात. या पाण्यात औषधी गुण असल्याची श्रद्धा असून ते मानसिक व शारीरिक त्रास कमी करण्यास मदत करते, असे मानले जाते.

**इटावा येथील पिलुआवाले हनुमान मंदिर**

उत्तर प्रदेशातील इटावाजवळ यमुना नदीच्या किनारी हे मंदिर स्थित आहे. येथे हनुमानजींची मूर्ती झोपलेल्या अवस्थेत आहे. भक्त येथे लाडूचा नैवेद्य अर्पण करतात. विशेष म्हणजे मूर्तीच्या तोंडात ठेवलेला लाडू आपोआप आत जातो, अशी श्रद्धा आहे, जी भक्तांसाठी एक चमत्कारिक अनुभव ठरते.

**खुलताबाद येथील भद्र मारुती मंदिर**

महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगराजवळील खुलताबाद येथे असलेले भद्र मारुती मंदिर अत्यंत प्रसिद्ध आहे. येथे हनुमानजी पूर्ण विश्रांतीच्या अवस्थेत असून त्यांच्या चेहऱ्यावर अपार शांतता दिसून येते. भक्तांच्या अखंड भजनांनी प्रसन्न होऊन हनुमानजी येथे या स्वरूपात प्रकट झाले, अशी कथा सांगितली जाते. ही सर्व मंदिरे हनुमानजींच्या वेगळ्या आणि अद्वितीय रूपाचे दर्शन घडवितात. श्रद्धा, भक्ती आणि चमत्कार यांचा संगम असलेली ही ठिकाणे भक्तांसाठी विशेष महत्त्वाची मानली जातात.




# ऋणमोचक मंगल स्तोत्राची काय आहे महती?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आजच्या या कलियुगात प्रत्येकाच्या आशा-आकांक्षा या वाढलेल्या आहेत. जीवनामध्ये प्रत्येक गोष्ट अतिशय गरजेची आहे त्या गरजा पूर्ण करण्यासाठी आपण सतत प्रयत्न व मेहनत करत असतो. परंतु करत असलेले प्रयत्न व कष्ट कुठेतरी कमी पडतात. त्यामुळे आपली व आपल्या कुटुंबाची अपेक्षा पूर्ण करू शकत नाही.

या जीवनामध्ये ध्येय गाठण्यासाठी व अपेक्षा पूर्ण करण्यासाठी काही वेळेला आपण कर्ज घेतो. घेतलेले कर्ज योग्य वेळेत व योग्य कालावधीत परत फेडणे हे एका मोठे महत्त्वाचे कार्य असते. घेतलेले कर्ज वेळेवर फेडण्यासाठी व आपला आर्थिक स्त्रोत्र वाढण्यासाठी आपण प्रयत्न करणे खूप गरजेचे असते. केलेल्या प्रयत्नास यश येण्यासाठी आपण काही उपासना करत असतो.

आपल्या ऋषीमुनींनी आपले आर्थिक स्त्रोत्र वाढण्यासाठी काही विविध स्तोत्र आपल्या संत-मुनी यांनी आपल्यासाठी लिहून ठेवलेली आहेत त्यातील एक म्हणजेच ‘ऋणमोचक मंगल स्तोत्र’ होय. या स्तोत्राचे आपण मनोभावे पाठ केल्यास व उपासना केल्यास आपल्या डोक्यावर असलेले कर्ज लवकर फेडण्यासाठी व आपले उत्पन्नाचे स्तोत्र वाढण्यासाठी याचा उपयोग अतिशय चांगला व परिणामकारक होतो, असे हे दिव्य स्तोत्र आहे.

कुठल्याही मंगळवारी, शनिवारी व बुधवारी कर्ज घेऊ नका. तसेच चतुर्थी, नवमी व चतुर्दशी या तिथींना कर्ज घेऊ नये किंवा कर्ज प्रकरण सादर करू नये. या रिक्त तिथी आहेत. या तिथींना कर्ज भरायचे असते किंवा या तिथीवर कर्जाच्या खात्यामध्ये थोडेफार तरी पैसे भरावेत. जेणेकरून आपले डोक्यावरील कर्ज लवकर फिटण्यास मदत होईल. कर्ज घेतलेल्या रकमेतील थोडी रक्कम लगेच त्याचक्षणी कर्जापोटी परत द्या. म्हणजे कर्ज लवकर उतरण्यास मदत होईल. म्हणजे १०० रुपये कर्ज घेतल्यास ५ रुपये लगेच परत द्या.

कर्जाचा पहिला हफ्ता मंगळवारी भरा ‘ॐ ऋण मुक्तेश्वराय नमः’ हा जप करून महादेवांचे दर्शन घेत जावा. श्रीगणेशांचे ऋणविमोचक स्तोत्र, मंगळाचे ऋणमोचक स्तोत्र दररोज म्हणण्याचा फायदा होतो.

### ऋणमोचक मंगल स्तोत्र

**मंगलो भूमिपुत्रश्च ऋणहर्ता धनप्रदः।**
**स्थिरासनो महाकायः सर्वकर्मविरोधकः ॥१॥**

**लोहितो लोहिताक्षश्च सामगानां कृपाकरः।**
**धरात्मजः कुजो भौमो भूतिदो भूमिनन्दनः॥२॥**

**अंगारको यमश्चैव सर्वरोगापहारकः।**
**व्रुष्टेः कर्ताऽपहर्ता च सर्वकामफलप्रदः॥३॥**

**एतानि कुजनामानि नित्यं यः श्रद्धया पठेत्।**
**ऋणं न जायते तस्य धनं शीघ्रमवाप्नुयात्॥४॥**

**धरणीगर्भसम्भूतं विद्युत्कान्तिसमप्रभम्।**
**कुमारं शक्तिहस्तं च मंगलं प्रणमाम्यहम्॥५॥**

**स्तोत्रमंगारकस्यैतत्पठनीयं सदा नृभिः।**
**न तेषां भौमजा पीडा स्वल्पाऽपि भवति क्वचित्॥६॥**

**अंगारक महाभाग भगवन्भक्तवत्सल।**
**त्वां नमामि ममाशेषमृणमाशु विनाशय॥७॥**

**ऋणरोगादिदारिद्र्यं ये चान्ये ह्यपमृत्यवः।**
**भयक्लेशमनस्तापा नश्यन्तु मम सर्वदा॥८॥**

**अतिवक्त्र दुराराध्य भोगमुक्त जितात्मनः।**
**तुष्टो ददासि साम्राज्यं रुश्टो हरसि तत्क्षणात्॥९॥**

**विरिंचिशक्रविष्णूनां मनुष्याणां तु का कथा।**
**तेन त्वं सर्वसत्त्वेन ग्रहराजो महाबलः॥१०॥**

**पुत्रान्देहि धनं देहि त्वामस्मि शरणं गतः।**
**ऋणदारिद्र्यदुःखेन शत्रूणां च भयात्ततः॥११॥**

**एभिर्द्वादशभिः श्लोकैर्यः स्तौति च धरासुतम्।**
**महतिं श्रियमाप्नोति ह्यपरो धनदो युवा॥१२॥**

**॥इति श्रीस्कन्दपुराणे भार्गवप्रोक्तं ऋणमोचक मंगलस्तोत्रम् सम्पूर्णम् ॥**



# महाराष्ट्रातील सर्वांत उंच भगवान हनुमानजींची मूर्ती!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यापासून साधारण २० किलोमीटर अंतरावर गोदावरी नदीच्या दक्षिण तीरावर खेडले झुंगे हे ऐतिहासिक गाव वसलेले आहे. या ठिकाणी असलेल्या ‘संतवान’ समोरील नक्षत्रवनात ही १११ फूट उंच, भव्य-दिव्य ‘अभयवरद म्हणजेच आशीर्वाद देणारी हनुमान मूर्ती उभारण्यात आली आहे. २००४ मध्ये मध्य प्रदेशातील शहडोल येथील कुशल कारागिरांनी अत्यंत मेहनतीने या मूर्तीचे काम पूर्ण केले.

खेडले झुंगे या गावाला ऐतिहासिक आणि रामायणकालीन संदर्भ असल्याचे मानले जाते. प्रभू श्रीरामांच्या वास्तव्याने पावन झालेल्या या भूमीत हनुमानजींची ही मूर्ती भक्तांचे मुख्य आकर्षण ठरत आहे. मूर्तीच्या समोरच एक मोठा आणि खुला परिसर म्हणजेच मंदिराचे प्रांगण आहे, जिथे होम-हवन आणि धार्मिक विधी केले जातात. दरवर्षी हनुमानजींची जयंती आणि संतांच्या पुण्यतिथी महोत्सवाच्या वेळी येथे भाविकांची अलोट गर्दी होते.

या मंदिराच्या परिसरात पाऊल ठेवताच मनाला एक वेगळीच शांतता आणि सकारात्मक ऊर्जा मिळते. आजूबाजूला असलेली हिरवीगार झाडे आणि स्वच्छ वातावरण यामुळे हे ठिकाण केवळ धार्मिकदृष्ट्याच नाही, तर पर्यटनासाठीही उत्तम पर्याय बनले आहे. नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यांच्या सीमेजवळ असल्याने येथे नेहमीच पर्यटकांची रेलचेल असते.

येथे येण्यासाठी नाशिकहून छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील नैताळे गावाकडून दक्षिणेकडे १३ किलोमीटर अंतर आहे. तसेच सिन्नर, लासलगाव आणि कोपरगाव येथूनही थेट बस किंवा खासगी वाहनाने सहज पोहोचता येते.

# हनुमानजी आणि श्रीमंगळग्रह देव यांचा आध्यात्मिक संबंध काय?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय धर्मपरंपरेत ग्रह आणि देवता यांचे परस्पर संबंध अत्यंत सूक्ष्म आणि गहन मानले जातात. नवग्रहांपैकी श्री मंगळग्रह देव हे शक्ती, पराक्रम, साहस, रक्त, ऊर्जा आणि युद्धकौशल्य यांचे कारक मानले जातात. दुसरीकडे भगवान हनुमानजी हे अदम्य शक्ती, निष्ठा, भक्ती, बुद्धिमत्ता आणि संकटमोचकत्वाचे प्रतीक आहेत. त्यामुळे अनेक भक्तांच्या मनात प्रश्न निर्माण होतो, की हनुमानजी आणि श्री मंगळग्रह देव यांचा नेमका आध्यात्मिक संबंध काय आहे? हा संबंध पुराण, ज्योतिष आणि साधना यातून कसा स्पष्ट होतो?

हनुमानजी आणि श्री मंगळग्रह देव यांचा संबंध प्रत्यक्ष रक्तसंबंध किंवा एखाद्या विशिष्ट पुराणकथेपुरता मर्यादित नसून तो प्रामुख्याने गुणधर्म, ऊर्जातत्त्व आणि आध्यात्मिक प्रभाव यांच्या आधारे विकसित झालेला आहे.

**श्री मंगळग्रह देवांचे तात्त्विक स्वरूप**

वैदिक ज्योतिषशास्त्रात श्री मंगळग्रह देव यांना भूमिपुत्र म्हटले जाते. मंगळ हा साहस, शौर्य, आत्मविश्वास, युद्धकौशल्य, नेतृत्व, निर्णयक्षमता आणि कृतीशीलता यांचा ग्रह मानला जातो. व्यक्तीच्या कुंडलीत मंगळ बलवान असल्यास ती व्यक्ती धाडसी, कर्तृत्ववान आणि संघर्षक्षम बनते. परंतु मंगळ अशुभ स्थितीत असल्यास राग, आक्रमकता, अपघात, वादविवाद आणि मानसिक अस्थिरता निर्माण होऊ शकते. म्हणूनच भारतीय परंपरेत मंगळाची ऊर्जा संतुलित आणि विधायक स्वरूपात व्यक्त होणे अत्यंत महत्त्वाचे मानले जाते.

**हनुमानजी : शक्ती आणि संयम यांचा आदर्श**

रामायण आणि इतर ग्रंथांमध्ये हनुमानजींचे वर्णन अतुलनीय शक्तीच्या अधिष्ठात्या म्हणून आढळते. त्यांच्याकडे अमर्याद सामर्थ्य होते, परंतु त्या शक्तीचा उपयोग त्यांनी केवळ धर्मरक्षण, सेवाभाव आणि प्रभु राम यांच्या कार्यासाठी केला.

**हनुमानजींच्या व्यक्तिमत्त्वातील तीन महत्त्वाचे गुण**

१) अद्वितीय शारीरिक आणि मानसिक शक्ती. २) परिपूर्ण आत्मसंयम. ३) अखंड भक्ती आणि नम्रता. याच गुणांमुळे ते मंगळाच्या उग्र उर्जेला संतुलित करणारे दैवत मानले जातात.

**हनुमानजी आणि श्री मंगळग्रह देव यांचा आध्यात्मिक संबंध**

धार्मिक आणि ज्योतिषीय परंपरेनुसार हनुमानजी हे मंगळतत्त्वाचे नियंत्रक आणि शुद्धीकरण करणारे देव मानले जातात. यामागे काही प्रमुख कारणे आहेत.



**१) समान ऊर्जातत्त्व :** श्री मंगळग्रह देव आणि हनुमानजी दोघेही शक्ती, पराक्रम, धैर्य आणि निर्भयता यांचे प्रतीक आहेत. परंतु फरक असा आहे की श्री मंगळग्रह देव हे मूलभूत, कधी-कधी उग्र आणि अनियंत्रित ऊर्जा दर्शवितात; तर हनुमानजी त्या उर्जेचे धर्मनिष्ठ, संयमी आणि लोककल्याणकारी रूप दर्शवितात. म्हणजेच हनुमानजी हे श्री मंगळग्रह देवांच्या शक्तीचे सर्वोच्च आध्यात्मिक रूप मानले जाऊ शकतात.

**२) मंगळदोष निवारणातील भूमिका :** भारतीय ज्योतिषशास्त्रात मंगळदोष अथवा कुजदोष असल्यास हनुमानजींची उपासना विशेष फलदायी मानली जाते. कारण भक्तीपरंपरेनुसार हनुमानजींच्या कृपेने व्यक्तीच्या जीवनातील आक्रमकता, मानसिक तणाव, वैवाहिक अडथळे आणि संघर्ष कमी होतात.

**३) मंगळवाराचा संबंध :** भारतीय परंपरेत मंगळवार हा श्री मंगळग्रह देवांचा जन्मवार मानला जातो. याच दिवशी हनुमानजींची उपासना मोठ्या प्रमाणावर केली जाते. अनेक मंदिरे, व्रतपरंपरा आणि स्तोत्रपठण यांचा केंद्रबिंदू मंगळवार असतो. यामागील आध्यात्मिक संदेश असा की मंगळाच्या उर्जेचे शुद्धीकरण भक्ती, सेवा आणि आत्मसंयमाद्वारे करावे.

हनुमानजी आणि श्री मंगळग्रह देव यांचा संबंध हा केवळ ज्योतिषीय उपायांपुरता मर्यादित नाही. तो शक्ती आणि संयम, साहस आणि विवेक, ऊर्जा आणि भक्ती यांच्यातील संतुलनाचे प्रतीक आहे. श्री मंगळग्रह देव मानवी जीवनातील कच्ची ऊर्जा दर्शवितात, तर हनुमानजी त्या उर्जेचे दिव्य, नियंत्रित आणि धर्माधिष्ठित रूप दर्शवितात. म्हणूनच भारतीय अध्यात्मात असा विश्वास व्यक्त केला जातो, की हनुमानजींच्या उपासनेद्वारे श्री मंगळग्रह देवांची ऊर्जा संतुलित होते, व्यक्तिमत्त्व अधिक सबळ बनते आणि जीवनातील संघर्षांना सकारात्मक दिशेने सामोरे जाण्याची क्षमता वाढते. हाच हनुमानजी आणि श्री मंगळग्रह देव यांच्यातील आध्यात्मिक संबंधाचा मूलभूत आणि सर्वाधिक स्वीकारलेला अर्थ आहे.

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**